# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ९२–२०१०/ दिनांक :

श्री. शंकर रामू देवर्षी ,
रा. मुचंडी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली — विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शंकर रामू देवर्षी, रा. मुचंडी, ता. जत, जि. सांगली यांनी ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर येथे नमुना अ मध्ये दि. १६.४.२०१० रोजी तक्रार अर्ज दाखल केला. तक्रारदार यांनी वितरण कंपनीच्या संख उप विभागाकडे शेतीपंपासाठी नवीन विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. ७.११.२००९ रोजी केला व प्रोसेसिंग फी रु. ५०/–त्याचदिवशी भरली आहे. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १६.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. १९.११.२००९ ला आदेश देवून कृती मानके विनियम २००५ परिशिष्ट अ प्रमाणे कृती मानके साध्य करण्यात वि.प.ला अपयश आल्यास तक्रारदारास द्यावयाच्या भरपाईबाबत निर्देश दिले आहेत.

या तक्रारीत मंचाकडून विलंबापोटी भरपाई मिळावी यासाठी आदेशाची मागणी केली आहे. तक्रारीसोबतच्या अधिकारपत्रावर ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांची सही नाही म्हणजे पात्र नाही असेच म्हणावे लागेल. वि.प.ने आपल्या दि. १५.५.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराचा अर्ज दि. ७.११.२००९ ला मिळाल्याचे मान्य केले व त्यांस दि. १३.४.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे. वि.प.ने पुढे असेही म्हटले आहे की, चलन भरलेले नाही, चाचणी अहवाल दिलेला नाही. चलन भरलेनंतर व चाचणी अहवाल दिल्यानंतर नियमाप्रमाणे कनेक्शन देण्यात येईल, ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम करावे लागते.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १८.५.२०१० रोजी सुनावणीस घेतली असता, तक्रारदार गैरहजर. विप.चे प्रतिनिधी श्री. दिवटे, सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. वि.प.तर्फे विलंबाबाबत कुठलेही लेखी/तोंडी स्पष्टीकरण दिले नाही. त्यामुळे दि. ७.१२.२००९ ते दि. १३.४.२०१० या कालावधीतील विलंबाच्या १६ आठवड्यांसाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. १६००/– नुकसान भरपाई देणेचे वि.प.ची जबाबदारी आहे, कारण कृती मानकातील तरतुदी पूर्ण करण्यात वि.प.ला अपयश आले आहे. त्यामुळे कृती मानके विनियम २००५ परिशिष्ट अ प्रमाणे प्रति आठवडा रु. १००/– भरपाई मिळण्याचा तक्रारदारास हक्क आहे. खालील आदेश –

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीच्या संख उप विभागाने तक्रारदार यांस दि. ७.१२.२००९ ते १३.४.२०१० या १६ आठवडे विलंबाच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. १६००/– भरपाई द्यावी.

३) सदर रकमेचे दोन बिलींग सायकलमधून समायोजन करावे व उर्वरित रक्कम रोखीने द्यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :